तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

सत्यमेव जयते

क्रमांक ८८३७/म.वि.स./ [illegible]-१
दिनांक 27 APR 2022

प्रेषक :
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :
(१) --------------------  २) --------------------  ३) --------------------

विषय : **मा.पीठासीन अधिकारी, मा.विरोधी पक्ष नेता, मा.सदस्य तसेच त्यांचे स्वीय सहायक यांच्या आयकराची परिगणना करणे, त्यांचे फॉर्म-१६ अ उपलब्ध करणे इत्यादीसाठी नोंदणीकृत सनदी लेखापाल संस्थेकडून दरपत्रक मागविण्याबाबत.**

महोदय,

मा.पीठासीन अधिकारी, दोन्ही सभगृहांचे मा.विरोधी पक्ष नेता, दोन्ही सभागृहाचे मा.सदस्य तसेच त्यांचे स्वीय सहायक व सदस्यांचे वाहनचालक यांच्या सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील आयकरासंदर्भातील कामाकाजाकरिता खालील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या नोंदणीकृत सनदी लेखापाल संस्थाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्ष नेते व दोन्ही सभागृहाचे मा.सदस्य या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या आयकरासंदर्भातील सदरहू कामकाज असून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयासारख्या अतिसंवेदनशील व महत्वाच्या संस्थेशी निगडीत हे काम असल्यामुळे उक्त मान्यवरांचे व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सांविधानिक स्थान लक्षात घेता उक्त कामाचे गांभिर्य समजून ते जबाबदारीने व कालब्धरित्या वेळेत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

(२) दरपत्रक सादर करणाऱ्या सनदी लेखापाल संस्थेस आयकराची परिगणना करणे (file return) फॉर्म-१६ उपलब्ध करुन देणे, वजा केलेला आयकर, आयकर विभागाकडे जमा करणे व त्याबाबत विवरणपत्र त्वरीत उपलब्ध करुन देणे, इत्यादी कामांचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा. उक्त काम स्वरुप व गांभिर्य लक्षात घेता दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेची यासंदर्भातील अर्हता व कामाचा अनु विचारात घेऊन दरपत्रक स्वीकृतीसंदर्भात व कामाचे कंत्राट देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

(३) दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने दरपत्रक सादर करताना त्यासोबत त्यांच्या जी.एस.टी. नोंदणीच्या प्रमाणपत्राची व पॅन कार्डची प्रमाणित (Attested) प्रत सादर करणे आवश्यक आहे.

२/-

(४) दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेकडे आवश्यक तपशीलाची (data) नोंद ठेऊन आयकराची परिगणना करण्याकरिता स्वतंत्र अद्यावत संगणक प्रणाली (software) उपलब्ध असणे आवश्यक आहे.

(५) नियुक्त करण्यात येणाऱ्या संस्थेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्व माहितीचा Data Back up राखण्याची व Data Recovery ची जबाबदारी त्या संस्थेची राहील.

(६) सदर दरपत्रकांकरीता रुपये ७७,८८०/- (G.S.T. सहित) प्रती वर्षही अपसेट रक्कम (Upset Price) असेल. **ज्या कामासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत त्याचे थोडक्यात स्वरुप :-**

१) कामाचा कालावधी - आर्थिक वर्ष सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४.

२) संखिकीय माहिती - अ) मा.पीठासीन अधिकारी, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते व दोन्ही सभागृहांचे मा.सदस्य-३२६.

ब) या मान्यवरांचे स्वीय सहायक व वाहन चालक .. ३२६ + ३२०

(नवीन मा.सदस्यांची निवड/नामनियुक्ती, विद्यमान मा.सदस्यांचे निधन, मंत्रीमंडळात बदल इ.कारणास्तव मान्यवरांच्या संख्येत तसेच स्वीय सहायकांची व वाहनचालकांची नियुक्ती, सेवासमाप्ती या कारणास्तव स्वीय सहायक व वाहनचालकांच्या संख्येत बदल होऊ शकतो).

३) उपरोक्त सर्वांना सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरिता फॉर्म-१६ उपलब्ध करून देणे.

४) सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरिता वजा करण्यात आलेल्या आयकराचा त्रैमासिक परतावा (Returns File) जमा करून त्याबाबतचे प्रमाणपत्र व विवरणपत्र त्वरीत या सचिवालयास उपलब्ध करून देणे. (27 A), (24 Q), सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरिता आयकर विषयक विभागाकडून नोटीस / स्पष्टीकरण पत्र आल्यास त्याचे निराकरण करणे.

५) उपरोक्त प्रकरणी आयकरा संदर्भात कोणतीही अडचण आल्यास सन्माननीय सदस्य व आयकर विभागाकडे पाठपुरावा करणे.

तरी आपण उपरोक्त नमूद आयकर विषयक सेवा देण्यास इच्छूक असल्यास आपण आपले दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यामधून प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ या पत्यावर दिनांक १६ मे, २०२२ पूर्वी किंवा त्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवावे.

आपले दरपत्रक स्विकृत झाल्यास आपणांस तसे कळविण्यात येईल, तसेच एखादे दरपत्रक कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे, याची कृपया नोंद द्यावी.

आपला,

**( विजय कोमटवार )**
**अवर सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**